# पिंपरी चिंचवड महानगरपालिका

## औद्योगिक प्रशिक्षण विभाग

## पिंपरी – ४११ ०१८

## जाहिर प्रकटन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या औद्योगिक प्रशिक्षण विभाग मोरवाडी व कासारवाडी येथे आय.टी.आय प्रशिक्षणार्थींसाठी विविध प्रकारचे कौशल्य कोर्सेस राबविण्याकामी जपान व जर्मन भाषा अभ्यासक्रम सुरु करणार आहे. सदरचा अभ्यासक्रम उपलब्ध करुन देणेकामी या क्षेत्रातील अनुभव असलेल्या अनुभवी इच्छुक पात्र संस्थाकडून अर्ज मागविणेत येत आहे. त्यानुसार इच्छुक अर्हताधारक संस्थांनी प्रस्तावाची हार्डकॉपीची एक प्रत (बंद पाकीट क्रमांक १ व २) औद्योगिक प्रशिक्षण विभाग, मोरवाडी, पिंपरी– १८ येथे मुदतीत सादर करावी. याविषयाची सविस्तर जाहिरात पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

जपान व जर्मन भाषा आत्मसात करणेस इच्छुक असणा-या प्रशिक्षणार्थ्यांच्या/ विदयार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने परिपूर्ण प्रस्ताव इच्छुक अर्हताधारक संस्थेने सादर करणे अत्यावश्यक आहे. त्याकरीता इच्छुक संस्थेची असणारी अर्हता व इतर आवश्यक अटी-शर्ती / निकष याबाबत सविस्तर माहिती महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर भरती (Recruitment) या लिंकवर तसेच होमपेजवर आमच्या बद्दल(About) ⟶ नोकरी विषयक (Recruitment) या मेनूमध्ये दि.१७/०१/२०२५ पासून पाहण्यास उपलब्ध होईल. इच्छुक संस्थांनी मनपाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या सविस्तर माहितीच्या अनुषंगाने त्यांचेकडील सर्व माहिती आवश्यक ती कागदपत्रे, पुरावे, अनुभवाचे दाखले, नोंदणी प्रमाणपत्र एका सिलबंद पाकीटात (पाकीट क्रमांक-१) व दरपत्रक (प्रपत्र – अ) दुस-या सिलबंद पाकीटात (पाकीट क्रमांक-२) अंतिम दिनांकापूर्वी वेळेमध्ये मा. प्राचार्य, औद्यौगिक प्रशिक्षण विभाग, मोरवाडी कोर्ट , अमृतेश्वर कॉलनी शेजारी, मोरवाडी, पिंपरी - १८. यांचे नावे दि.२३/०१/२०२५ रोजी सायं ५.०० वा. पर्यंत टपालाने पोहचतील अथवा समक्ष बंद पाकिटात सादर करावेत. मुदतीत प्राप्त न झालेले व अर्धवट असलेले प्रस्ताव यांचा कोणताही विचार केला जाणार नाही, याची नोंद घेण्यात यावी.

(चंद्रकांत इंदलकर)
अति. आयुक्त (३)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८

क्र. औप्रवि/०५/कावि/ ०७ /२०२५
दि. १६/०१/२०२५

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या औद्योगिक प्रशिक्षण विभाग मोरवाडी व कासारवाडी येथे आय.टी.आय प्रशिक्षणार्थींसाठी परदेशी भाषा कोर्सेस राबविण्याकामी जपान व जर्मन भाषा अभ्यासक्रम उपलब्ध करुन देणेबाबत अर्हताधारक इच्छुक संस्थाकडून अर्ज मागविणेबाबत सविस्तर माहिती.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या औद्योगिक प्रशिक्षण विभाग मोरवाडी व कासारवाडी येथे आय.टी.आय प्रशिक्षणार्थींसाठी परदेशी भाषा कोर्सेस राबविण्याकामी जपान व जर्मन भाषा अभ्यासक्रम सुरु करणार आहे. सदरचा अभ्यासक्रम उपलब्ध करुन देणेकामी या क्षेत्रातील अनुभव असलेल्या अनुभवी इच्छुक पात्र संस्थाकडून अर्ज मागविण्यात येत आहे. त्यानुसार इच्छुक संस्थांनी त्यांचेकडील परिपूर्ण प्रस्तावाची व प्रपत्र – अ ची एक प्रत (हार्डकॉपी) आवश्यक त्या कागदपत्रासह मा. प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण विभाग, मोरवाडी, पिंपरी-१८. यांचे नावे अथवा समक्ष खालील मुदतीत सादर करावी.

**प्रस्ताव स्विकारण्याचा कालावधी - दि.१७/०१/२०२५ ते दि.23/०१/२०२५ पर्यंत**

**अंतिम दिनांक व वेळ - दि. 23/०१/२०२५ ~~दुपारी ३.००~~ सायं ५.०० पर्यंत**

इच्छुक संस्थेकडून प्राप्त झालेले प्रस्ताव मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार मा. अति.आयुक्त(३), पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - १८. यांनी स्वत:कडे राखून ठेवला आहे.

सदर प्रस्ताव सादर करणेबाबत काही अडचणी निर्माण झाल्यास मा. प्राचार्य औद्योगिक प्रशिक्षण विभाग, मोरवाडी पिंपरी पुणे – ४११०१८ यांचेशी समक्ष संपर्क साधून याबाबतची अधिक माहिती उपलब्ध करुन घेणेत यावी.

❖ **इच्छुक संस्थांनी खालील निकष पूर्ण करणे आवश्यक आहे.**

१) इच्छुक संस्था / आस्थापना नोंदणीकृत – मान्यताप्राप्त असाव्यात त्याचे पुराव्यार्थ संस्थेने नोंदणी प्रमाणपत्रांच्या प्रती सोबत सादर करणे आवश्यक राहील.

२) या क्षेत्रातील राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय मानांकन (accreditation) प्राप्त असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करावे.

३) विद्यार्थ्यांना जपान व जर्मन भाषेच्या आंतरराष्ट्रीय परीक्षांसाठी प्रशिक्षण देणे व पात्रता चाचण्या (ऑनलाईन / ऑफलाईन) घेण्याचा संस्थेस अनुभव असल्यास,त्याबाबतचे पुरावे सादर करण्यात यावे.

४) विद्यार्थी व पालक यांचे आंतरराष्ट्रीय भाषेसंदर्भात समुपदेशन करण्याचा अनुभव असल्यास त्याबाबतचे पुरावे सादर करावे.

५) जपान व जर्मन भाषा कोर्स कालावधी व त्याबाबतची माहिती सादर करावी.

६) विद्यार्थ्यांना परदेशात अथवा भारतात जपान व जर्मन भाषेच्या आधारवर रोजगार मिळेपर्यंत Placement Support देणे आवश्यक राहील. याप्रकारचे Placement Support दिले असल्यास त्याबाबतचे पुरावे सादर करण्यात यावे.

७) जपान व जर्मन भाषा अभ्यासक्रम पुर्ण झाल्यावर प्रशिक्षणार्थी यांना अधिकृत प्रमाणपत्र देणे.

८) कोर्स अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर जपान व जर्मन भाषेची परदेशी परिक्षा याकामी संपूर्ण प्रशिक्षण/ मार्गदर्शन करणे. याशिवाय सदर परिक्षेस बसणा-या विदयार्थ्यांना संपूर्ण तांत्रिक सहकार्य करणे.

९) विदयार्थ्यांकरीता जपान व जर्मन भाषा कार्यशाळा तसेच तज्ञ व्यक्तींचे भेटीचे नियोजन करणे.

१०) जपान व जर्मन भाषा अभ्यासक्रम पूर्ण झालेल्यांना परदेशात अथवा भारतात कौशल्य विकासा संबंधित व इतर परदेशी भाषा कोर्सेस करू इच्छिणा-या विदयर्थ्यांसाठी मार्गदर्शन करणे.

११) विद्यार्थ्यांना स्वयंरोजगार किंवा उद्योजक बनण्यासाठी आवश्यकते नुसार उदा. स्टार्टअप, विविध शासकीय योजना इ. बाबत मार्गदर्शन देणे आवश्यक राहील.

१२) कोर्स अभ्यासक्रमाचे कालावधीत सर्व विद्यार्थ्यांकडे संस्थेने वैयक्तीकरीत्या लक्ष घालून त्यांचा संपूर्ण जपान व जर्मन भाषा कोर्स व्यवस्थितपणे पार पाडणे व विदयार्थ्यांना सदर भाषा पूर्ण अवगत होणे आवश्यक राहील. तसेच कोर्सची व विद्यार्थ्यांची वेळोवेळी अद्यायावत माहिती (अपडेट) आय.टी.आय विभागास पुरविणे बंधनकारक राहील.

१३) जपान व जर्मन भाषा कोर्स अभ्यासक्रमासाठी आवश्यक पुस्तके व संबंधित साहित्य इच्छुक संस्थेने पुरविणे आवश्यक राहील. तसेच विदयार्थी पालक समुपदेशन, स्टार्टअप, विविध शासकीय व PSU योजनांचे मार्गदर्शन व प्लेसमेंट सपोर्ट इ. सर्व बाबींकरीता इच्छुक संस्थेने सोबत जोडलेल्या प्रपत्र – अ मध्ये प्रति विद्यार्थी फी / शुल्क (सर्व करासहीत) इच्छुक संस्थेने माहिती सादर करावी.

१४) निवड झालेल्या संस्थेबरोबर सदर कामाबाबत १ वर्षांचा करारनामा करण्यात येईल. या कालावधीत त्यांनी कोर्सविषयक केलेले कामकाज यांची पडताळणी मनपामार्फत करण्यात येईल.

औद्योगिक प्रशिक्षण विभाग मोरवाडी व कासारवाडी येथे आय.टी.आय प्रशिक्षणार्थींसाठी जपान व जर्मन भाषा अभ्यासक्रम घेण्यास इच्छुक असणा-या विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने वरील सर्व नमूद निकष / बाबी या इच्छुक संस्थेने पूर्ण करणे अत्यावश्यक आहे. तरी इच्छुक संस्थेने याकरीता दोन स्वतंत्र बंद पाकिटात माहिती सादर करावी. बंद पाकिट क्रमांक – १ मध्ये इच्छुक संस्थेने अ.क्र. १ ते ६ चे अनुषंगाने नोदणी प्रमाणपत्र (Certificate) व सबळ पुरावे तसेच कोर्स कालावधी , Contents यांसह कोर्सची संपूर्ण माहिती सादर करावी. तर बंद पाकिट क्रमांक – २ मध्ये सोबत जोडण्यात आलेल्या प्रपत्र – अ मधील निकषाच्या अनुषंगाने या संपूर्ण कोर्स अभ्यासक्रम ते Placement Support इ. बाबींकरीता आकारण्यात येणारी प्रति विद्यार्थी फी / शुल्क (सर्व करांसहित) नमूद करण्यात यावी. म्हणजेच पाकिट क्र. २ मध्ये केवळ प्रपत्र - अ असेल व हे पाकिट सिल / व्यवस्थित बंद करुन पाकिट क्र.१ सह कार्यालयात सादर करावे. याप्रकारे दोन स्वतंत्र बंद पाकिट क्रमांक १ व २ विहित मुदतीत मा. प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण विभाग, मोरवाडी यांचे नावे अथवा समक्ष सादर करावेत. मुदतीनंतर प्राप्त होणा-या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. याची नोंद घेण्यात यावी.

(चंद्रकांत इंदलकर)
अति. आयुक्त (३)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – १८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
औद्योगिक प्रशिक्षण विभाग

औद्योगिक प्रशिक्षण विभाग मोरवाडी व कासारवाडी येथे आय.टी.आय प्रशिक्षणार्थींसाठी परदेशी भाषा कोर्सेस राबविण्याकरीता जपान व जर्मन भाषा अभ्यासक्रम उपलब्ध करुन देणेबाबत इच्छुक संस्थाकरीता निकष

'प्रपत्र – अ'

| औद्योगिक प्रशिक्षण विभागमोरवाडी व कासारवाडी येथेआय.टी.आय प्रशिक्षणार्थींसाठी जपान व जर्मन भाषा अभ्यासक्रम उपलब्ध करुन देणेबाबत इच्छुक संस्थाकरीता निकष | संपूर्ण कोर्स अभ्यासक्रमा करीता इच्छुक संस्थेकडून या सर्व निकषांच्या अनुषंगाने आकारली जाणारी प्रति विद्यार्थी फी / शुल्क सर्व करासहीत (र.रु.) एकत्रित नमूद करावी |
|---|---|
| • विद्यार्थ्यांना जपान व जर्मन भाषा संपूर्ण अभ्यासक्रमासाठी प्रशिक्षण देणे.<br>• कोर्स अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर जपान व जर्मन भाषेची परदेशी परिक्षा याकामी संपूर्ण प्रशिक्षण / मार्गदर्शन करणे. याशिवाय सदर परिक्षेस बसणा-या विदयार्थ्याना संपूर्ण तांत्रिक सहकार्य करणे.<br>• विद्यार्थी व पालक यांचे समुपदेशन करणे.<br>• जपान व जर्मन भाषा अभ्यासक्रम पुर्ण झाल्यावर प्रशिक्षणार्थी यांना अधिकृत प्रमाणपत्र देणे.<br>• विदयार्थ्यांकरीता जपान व जर्मन भाषा कार्यशाळा तसेच तज्ञ व्यक्तींचे भेटीचे नियोजन करणे.<br>• जपान व जर्मन भाषा अभ्यासक्रम पूर्ण झालेल्या विदयार्थ्यांना परदेशात अथवा भारतात कौशल्य विकासासंबंधित व इतर परदेशीभाषा कोर्सेस करू इच्छिणा-या विदयर्थ्यांसाठी मार्गदर्शन करणे.<br>• विद्यार्थ्यांना परदेशात अथवा भारतात जपान व जर्मन भाषेच्या आधारवर रोजगार मिळेपर्यंत Placement Support देणे.<br>• विद्यार्थ्यांना स्वयंरोजगार किंवा उद्योजक बनण्यासाठी आवश्यकते नुसारउदा. स्टार्टअप, विविध शासकीय व PSU योजना इ. बाबत मार्गदर्शन देणे.<br>• कोर्स अभ्यासक्रमाचे कालावधीत सर्व विद्यार्थ्यांकडे इच्छुक संस्थेने वैयक्तीकरीत्या लक्ष घालून त्यांचा जपान व जर्मन भाषा संपूर्ण कोर्स व्यवस्थितपणे पार पडेल यासाठी विद्यार्थ्यांना संपूर्ण मागदर्शन करणे, कोर्सची व विद्यार्थ्यांची वेळोवेळी अद्यायावत माहिती (अपडेट) विद्यार्थ्यांचे पालक तसेच आय.टी.आय विभागास पुरविणे.<br>• जपान व जर्मन भाषेची आवश्यक पुस्तके उपलब्ध करून देणे. याशिवाय कोर्सच्या अनुषंगाने आवश्यक ते इतर साहित्य , नोटसइ. पुरविणे. | |

(संस्था / आस्थापना नाव)
सही व शिक्का

(टिप :- सदर 'प्रपत्र –अ' हे व्यवस्थित भरुन स्वतंत्र बंद पाकिट क्र.२ मध्ये सिलबंद करुन, बंद पाकिट क्र. १ सह सादर करावे.)

अति. आयुक्त (३)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८